BHARATI INTERNATIONAL JOURNAL OF MULTIDISCIPLINARY

RESEARCH & DEVELOPMENT (BIJMRD)

(Open Access Peer-Reviewed International Journal)

DOI Link : https://doi.org/10.70798/Bijmrd/04041018

Available Online: www.bijmrd.com | BIJMRD Volume: 4 | Issue: 04(1) | April 2026 | e-ISSN: 2584-1890

# माध्यमिक शिक्षणातील उद्योजकीय कौशल्यांचा विकास : NEP 2020 च्या पार्श्वभूमीवरील एक संकल्पनात्मक अभ्यास

**पाटील मिनल काशिराम[1] & प्रो.डॉ. शीतल झाल्टे[2]**

1. संशोधन अभ्यासक, श्रीमती कपिला खांडवाला कॉलेज ऑफ एजुकेशन, सांताक्रूज, मुंबई
Email: minalpatil2712@gmail.com
2. प्रोफेसर, श्रीमती कपिला खांडवाला कॉलेज ऑफ एजुकेशन, सांताक्रूज, मुंबई

**Abstract :**

*२१व्या शतकातील बदलत्या सामाजिक-आर्थिक परिस्थितीत उद्योजकीय कौशल्यांचा विकास हा शालेय शिक्षणाचा एक महत्त्वाचा घटक म्हणून उदयास येत आहे. प्रस्तुत लेखाचा उद्देश राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० (NEP 2020) च्या पार्श्वभूमीवर माध्यमिक शिक्षणातील उद्योजकीय कौशल्यांच्या विकासासाठी एक बहुस्तरीय संकल्पनात्मक चौकट मांडणे हा आहे. लेखात उद्योजकीय कौशल्यांची संकल्पना व त्यांचे प्रमुख प्रकार स्पष्ट करण्यात आले असून संबंधित साहित्य आणि धोरणात्मक तरतुदींच्या आधारे शाळा-आधारित उद्योजकता शिक्षणाच्या शक्यता विश्लेषित केल्या आहेत. हा संकल्पनात्मक अभ्यास उद्योजकता शिक्षणासाठी शिक्षकांची भूमिका, शाळा-स्तरावरील संरचना आणि व्यापक परिसंस्थेचे महत्त्व अधोरेखित करतो. त्यामुळे माध्यमिक स्तरावर उद्योजकता शिक्षण राबविण्यासाठी एक सुसंगत शैक्षणिक दृष्टिकोन विकसित होण्याची शक्यता सूचित होते.*

**Keywords:** *माध्यमिक शिक्षणातील, कौशल विकास, NEP 2020.*

## प्रस्तावना (Introduction)

२१ वे शतक हे ज्ञानाधारित अर्थव्यवस्थेचे युग मानले जाते, ज्याध्ये उद्योजकतेची भूमिका अत्यंत निर्णायक बनली आहे. जागतिकिकरण, डिजिटल तंत्रज्ञान आणि नवोन्मेषावर आधारित उद्योगरचना जलद गतीने बदलत आहे. या पाश्वभूमीवर उद्योजकता ही आर्थिक प्रगतीसाठी तसेच सामाजिक परिवर्तनासाठी प्रभावी साधन ठरते. रोजगारनिर्मिती आणि स्पर्धात्मक क्षमतावृद्धीमध्ये उद्योजकतेचे महत्त्व लक्षणीय आहे. गत दोन दशकांत पारंपारिक नोकऱ्या कमी होत असून उद्योगक्षेत्रात तांत्रिक, समस्या-निराकरण व नवकल्पनात्मक कौशल्यांची मागणी वाढली आहे. त्यामुळे केवळ शैक्षणिक पात्रतेपेक्षा आचरण्यायोग्य कौशल्ये विकसित करणे युवकांसाठी आवश्यक ठरते.

भारतातील वाढती युवा लोकसंख्या मोठी लोकसंख्यात्मक संधी निर्माण करते; मात्र युवकांमध्ये आवश्यक रोजगारयोग्यता कौशल्यांचा अभाव आढळतो. अनेक पदवीधारक कौशल्य-अभावामुळे उपलब्ध संधींचा लाभ घेऊ शकत नाहीत. त्यामुळे राष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी कौशल्यवृद्धी अत्यावश्यक ठरते.आधुनिक शिक्षणात स्वतंत्र विचार, जोखीम व्यवस्थापन, नवोन्मेष व समस्या-निराकरण कौशल्यांचा विकास महत्त्वाचा आहे. शालेय स्तरावर उद्योजकीय मनोवृत्ती व संबंधित कौशल्यांचे संवर्धन केल्यास विद्यार्थी आत्मनिर्भर व संधी ओळखण्यास सक्षम होतात.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ने भारतीय शिक्षण प्रणालीमध्ये कौशल्याधिष्ठीत, लवचिक व बहुविध शिक्षणाचा दृष्टीकोन दृढ केला आहे. या धोरणात अनुभवाधारित शिक्षण, व्यावसायिकता आणि उद्योजकीय क्षमतांचा विकास यांना विशेष स्थान देण्यात आले आहे. विद्यार्थ्यांना वास्तविक जीवनाशी जोडणारे प्रकल्प, अभ्यासक्रम आणि प्रशिक्षण कार्यक्रम या उद्योजकतेकेंद्रित शिक्षणासाठी व्यापक व व्यवहार्य चौकट निर्माण करते. हा लेख माध्यमिक शिक्षणातील उद्योजकीय कौशल्यांच्या विकासासाठी एक संकल्पनात्मक चौकट मांडतो.

**उद्योजकीय कौशल्यांची संकल्पना (Concept of Entrepreneurial Skills)**

उद्योजकता ही केवळ उपक्रम सुरु करण्याची क्रिया नसून नव्या कल्पना प्रत्यक्षात आणण्याची सर्जनशील प्रकिया आहे. यात समस्या ओळखणे, उपाय शोधणे आणि मुल्यनिर्मिती करण्यासाठी कृती करणे यांचा समावेश होतो.

तक्ता १ : उद्योजकीय कौशल्यांचे प्रकार आणि त्यांचे वर्णन

(राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०, राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळ २०१५ )

| क्रमांक | कौशल्य प्रकार | वर्णन |
|---|---|---|
| १. | संज्ञानात्मक कौशल्ये | सर्जनशीलता, समस्या–निराकरण व संधी ओळखण्याची क्षमता उद्योजकाला तर्काधिष्ठित विचार आणि नवकल्पना विकसित करण्यात मदत करते. |
| २. | सामाजिक–भावनिक कौशल्ये | नेतृत्त्व,संवाद,सहकार्य आणि आत्मविश्वास प्रभावी गटकार्य व सकारात्मक संबंध निर्माण करण्यात सहाय्यक ठरतात. |
| ३. | व्यवस्थापन कौशल्ये | नियोजन, निर्णयक्षमता आणि आर्थिक साक्षरता संसाधनांचे सुयोग्य व्यवस्थापन व व्यवसायाची स्थिरता सुनिश्चित करतात. |
| ४. | क्रियाभिमुख कौशल्ये | प्रारंभिक आवृत्ती (नमुना), प्रयोगशीलता आणि जोखीम व्यवस्थापन उद्योजकाला कल्पना तपासून प्रत्यक्षात उतरविण्यास सक्षम करतात. |

**माध्यमिक विद्यार्थ्यांसाठी उद्योजकतेचे महत्त्व (Relevance for Secondary Students)**

१४ ते १६ वयोगटातील माध्यमिक स्तर हा विद्यार्थ्यांच्या संज्ञानात्मक व सामाजिक-भावनिक विकासाचा संवेदनशील टप्पा आहे, जिथे कुतूहल, स्वायत्तता व समस्या-आकलन क्षमतांचा वेगाने विकास होतो (पियाजे, १९७२). या टप्प्यात विद्यार्थी करिअरविषयक प्राथमिक ओळख निर्माण करतात आणि उद्योजकीय शिक्षण त्यांना भविष्यातील संधी समजून घेण्यास दिशा देते. उद्योजकतेवर आधारित शिक्षण समस्या सोडवणे, निर्णयक्षमता, सहयोग व संवाद यांसारखी वास्तविक जीवनाशी निगडित कौशल्ये विकसित करते. ही कौशल्ये शालेय ज्ञानाचा व्यावहारिक उपयोग करण्यास व बदलांशी जुळवून घेण्यास मदत करतात. तसेच, उद्योजकता आत्मनिर्भरता, सर्जनशीलता, नेतृत्व व आत्मविश्वास वाढवते, ज्यांना "भविष्यासाठी सक्षम क्षमता"("Future-ready competencies")म्हणून ओळखले जाते.राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० माध्यमिक स्तरावर अशा कौशल्यांचा विकास अनिवार्य मानते.प्रकल्पाधारित शिक्षण, बहुविषयक उपक्रम व नवोन्मेषात्मक शिकण्याच्या संधींमुळे २१व्या शतकातील कौशल्यांचा विकास सुलभ होतो. त्यामुळे उद्योजकता ही आधुनिक विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासाचा मूलभूत घटक ठरते.

**धोरणात्मक संदर्भ (Policy Context: NEP 2020)**

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० नुसार इयत्ता ६ पासूनच विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षणाची ओळख करून देण्यावर भर देण्यात आला आहे, ज्यामुळे त्यांना व्यावहारिक कौशल्ये व कामाचा प्रत्यक्ष अनुभव मिळतो (शालेय शिक्षण मंत्रालय, २०२०).

‘दप्तरविना शाळा’ उपक्रमांतर्गत विद्यार्थी कारागीर, व्यावसायिक आणि स्थानिक उद्योजकांकडून प्रत्यक्ष कार्य-अनुभव घेतात, ज्यामुळे अनुभवाधारित शिक्षण अधिक सशक्त होते. तसेच, या धोरणात कौशल्याधारित आणि बहुविषयक अभ्यासक्रमाची रचना सुचवण्यात आली आहे, जी विद्यार्थ्यांमध्ये २१व्या शतकातील आवश्यक कौशल्यांचा विकास साधते.

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०स्थानिक कौशल्ये, कामाधारित शिक्षण व शाश्वत विकासाशी संबंधित ज्ञान विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यावर विशेष भर देते, ज्यामुळे शिक्षण स्थानिक संदर्भांशी अधिक जोडले जाते आणि भविष्यातील जबाबदार नागरिक घडतात. याशिवाय, समग्र प्रगती पत्रिका (Holistic Progress Card) विद्यार्थ्यांच्या संज्ञानात्मक, सामाजिक-भावनिक व कौशल्याधारित कामगिरीचे सतत व व्यापक मूल्यमापन करण्याची संधी उपलब्ध करून देते. अशा प्रकारे राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०विद्यार्थ्यांना शैक्षणिक ज्ञानाबरोबरच उद्योजकीय व जीवनकौशल्यांच्या विकासासाठी सक्षम शैक्षणिक चौकट प्रदान करते.

**संबंधित साहित्याचा आढावा (Review of Literature)**

युवकांमधील कौशल्यअभाव हा रोजगारक्षमतेसमोरील गंभीर प्रश्न असल्याचे आंतरराष्ट्रीय कामगार संघटना (२०२०) व बॉली आणि इतर (२०१८)यांनी स्पष्ट केले असून, कौशल्य-विकासाच्या गुणवत्तेचा रोजगारक्षमतेवर थेट परिणाम दिसतो. युनेस्को २०१८ यांनी जीवन कौशल्ये व उद्योजकीय वृत्ती यांतील संबंध अधोरेखित केला, तर लेक्युस २०१५ यांनी उद्योजकता शिक्षण हे भावनिक सहभाग, प्रेरणा व कृतीकेंद्रित वर्तनाशी जोडलेले असल्याचे दाखवले. जागतिक बँक २०२० यांनी व्यावसायिक शिक्षणातील गुणवत्तेतील तफावत दर्शवली, तर चड्डा आणि सोनी (२०१९) यांनी भारतीय शाळांमधील कार्यक्रम अपुरे व असमान असल्याचे नमूद केले. शाळा-स्तरावरील उद्योजकता उपक्रमांचे सकारात्मक परिणाम आर्थिक सहकार्य आणि विकास संघटना (२०१९) यांनी नोंदवले असून,हॅंगआणि कुर्चेव्स्का (२०१६) यांच्या अभ्यासानुसार “learning-by-doing” पद्धतीमुळे समस्या-निराकरण व आत्मविश्वास वाढतो. आंतरराष्ट्रीय अभ्यासांनुसार शालेय स्तरावर उद्योजकता समाविष्ट करण्याचा केंद्रबिंदू सर्जनशीलता, स्वायत्तता व नवोन्मेषाचा विकास हा आहे (रंको आणि जेगर, २०१२; येरोपियन कमिशन, २०१६). गीब (२००२) व मोरीस, कुरात्को आणि क्रोनवोल (२०१३) यांनी उद्योजकीय शिक्षणामुळे स्वायत्त विचार, सर्जनशीलता व निर्णयक्षमता विकसित होते असे स्पष्ट केले.

उपलब्ध साहित्यामध्ये माध्यमिक विद्यार्थ्यांसाठी आवश्यक उद्योजकीय कौशल्यांची स्पष्ट आणि सर्वमान्य व्याख्या उपलब्ध नाही. विविध अभ्यासांत विविध कौशल्य-वर्गीकरणे आढळतात, परंतु माध्यमिक स्तरासाठी संरचित चौकट तयार केलेली नाही.शिक्षकांची उद्योजकतेविषयी जागरूकता, त्यांची वृत्ती, तसेच कौशल्याधारित शिक्षण देण्याची तयारी या बाबींवर संशोधन अत्यल्प आहे. या घटकांचा विद्यार्थ्यांच्या उद्योजकीय विकासावर महत्त्वाचा परिणाम असूनही त्याकडे संशोधनात पुरेसे लक्ष दिले गेलेले नाही.

**शाळांमधील उद्योजकता-विकासासाठी संकल्पनात्मक चौकट (Conceptual Framework)**

शाळांमधील उद्योजकीय कौशल्यांचा विकास हा एखाद्या स्वतंत्र घटकामुळे न घडता, विद्यार्थी, शिक्षक, शाळा आणि व्यापक परिसंस्था या सर्व स्तरांवरील घटकांच्या परस्परसंवादातून आकार घेणारी प्रक्रिया म्हणून पाहता येऊ शकेल. त्यामुळे उद्योजकता शिक्षण प्रभावी ठरण्यासाठी या विविध स्तरांवर राबविल्या जाणाऱ्या शैक्षणिक कृती, अध्यापन रणनीती आणि संस्थात्मक निर्णय यांचा सुसंगत समन्वय आवश्यक ठरतो. प्रस्तुत संकल्पनात्मक चौकट या बहुस्तरीय प्रक्रियेचे स्वरूप स्पष्ट करण्याचा प्रयत्न करते.

- **विद्यार्थी-स्तरावरील कौशल्ये**

विद्यार्थी-स्तरावर उद्योजकीय कौशल्यांचा विकास प्रकल्पाधारित कार्य, खुल्या स्वरूपातील समस्या, कल्पना-सादरीकरण, गटचर्चा आणि निर्णय घेण्याच्या संधी यांद्वारे साध्य होऊ शकेल. अशा शिकण्याच्या अनुभवांमध्ये विद्यार्थ्यांना विविध पर्याय तपासणे, उपलब्ध संसाधनांचा विचार करणे आणि संभाव्य परिणामांचा अंदाज घेणे अपेक्षित असते. यामुळे सर्जनशीलता, विश्लेषणात्मक विचार आणि संधी ओळखण्याची क्षमता विकसित होण्याची शक्यता निर्माण होऊ शकेल. तसेच, सुरक्षित वातावरणात प्रयोग करण्याची मुभा दिल्यास जोखीम व्यवस्थापनाचे कौशल्य हळूहळू विकसित होऊ शकेल, ज्यामुळे विद्यार्थी अनिश्चित परिस्थितीत संतुलित व विचारपूर्वक निर्णय घेण्यास अधिक सक्षम बनू शकतील.

- **शिक्षक-स्तरावरील घटक**

विद्यार्थ्यांमधील उद्योजकीय कौशल्यांचा विकास शिक्षकांच्या अध्यापन पद्धती आणि भूमिकांशी निकटपणे संबंधित असू शकेल. उद्योजकीय कौशल्यांविषयी शिक्षकांची जागरूकता आणि सकारात्मक वृत्ती असल्यास प्रकल्पाधारित अध्यापन, समस्या-केंद्रित प्रश्नरचना, चिंतनात्मक संवाद आणि अभिप्राय-आधारित मार्गदर्शन यांसारख्या रणनीती प्रभावीपणे राबविता येऊ शकतील. अशा अध्यापन प्रक्रियेत शिक्षक माहिती देणाऱ्या भूमिकेपेक्षा मार्गदर्शक आणि मेंटॉरच्या भूमिकेत कार्य करू शकतील. परिणामी, विद्यार्थ्यांना निर्णयप्रक्रियेवर विचार करण्याची, चुका शिकण्याच्या संधी म्हणून स्वीकारण्याची आणि स्वतःच्या कृतींचे परावर्तन करण्याची सवय लागण्याची शक्यता निर्माण होऊ शकेल.

- **शाळा-स्तरावरील संरचना**

विद्यार्थी आणि शिक्षकांच्या प्रयत्नांना संस्थात्मक अधिष्ठान मिळण्यासाठी शाळा-स्तरावरील संरचना महत्त्वाची ठरू शकेल. नवोन्मेष केंद्रे आणि मेकर स्पेसेस प्रभावी ठरण्यासाठी त्यांचा वापर विशिष्ट वर्ग, विषय किंवा मूल्यांकन प्रक्रियेशी जोडला गेल्यास उद्योजकता शिक्षण अधिक अर्थपूर्ण ठरू शकेल. उदाहरणार्थ, प्रकल्पासाठी स्वतंत्र वेळ देणे, त्या प्रकल्पाचे औपचारिक मूल्यमापन करणे आणि विद्यार्थ्यांना त्यांच्या कामाचे सादरीकरण करण्याची संधी उपलब्ध करून देणे — अशा संरचनात्मक निर्णयांद्वारे उपक्रमांसाठी आवश्यक संधी निर्माण केल्या जाऊ शकतील व त्यासाठी उपयुक्त उपाययोजना आखल्या जाऊ शकतील. तसेच, विद्यार्थी चालवत असलेले क्लब आणि उपक्रम नियोजनबद्ध पद्धतीने राबविले गेल्यास नेतृत्व, निर्णयक्षमता आणि प्रत्यक्ष कृतीचा आत्मविश्वास विकसित होण्यास पोषक वातावरण निर्माण होऊ शकेल.

- **परिसंस्था-स्तर (Ecosystem Level)**

शाळा ही व्यापक सामाजिक आणि आर्थिक परिसंस्थेचा भाग असल्याने परिसंस्था-स्तरावरील सहभाग उद्योजकता शिक्षणाला वास्तवाशी जोडण्यास मदत करू शकेल. उद्योगभेटी, स्थानिक उद्योजकांशी संवाद, समुदायाधारित प्रकल्प आणि क्षेत्रीय अभ्यास यांसारख्या उपक्रमांचा समावेश केल्यास विद्यार्थ्यांना वास्तविक व्यावसायिक प्रक्रिया, सामाजिक गरजा आणि स्थानिक संधी यांची जाण होऊ शकेल. अशा अनुभवांनंतर चिंतनात्मक चर्चा, सादरीकरणे किंवा लघु अहवाल यांसारख्या कृतींच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना अनुभवाचे विश्लेषण करण्याची संधी दिल्यास उद्योजकीय विचार अधिक संदर्भयुक्त आणि वास्तवाधारित होऊ शकेल.

- **अभ्यासक्रम व मूल्यमापन**

वरील सर्व स्तरांवरील घटक प्रभावीपणे कार्यान्वित होण्यासाठी अभ्यासक्रम आणि मूल्यमापन पद्धतींचा सुसंगत समन्वय आवश्यक ठरू शकेल. उद्योजकीय कौशल्यांचा सातत्यपूर्ण विकास साधण्यासाठी प्रकल्पाधारित मूल्यमापन, कौशल्य-केंद्रित मूल्यांकन निकष (rubrics), विद्यार्थी पोर्टफोलिओ आणि परावर्तक नोंदी यांचा अभ्यासक्रमात समावेश केल्यास विद्यार्थ्यांच्या निर्णयप्रक्रियेचा, कौशल्यवापराचा आणि शिकण्याच्या प्रवासाचा सर्वांगीण मागोवा घेणे शक्य होऊ शकेल. अशा मूल्यमापन पद्धतींमुळे कौशल्यविकास ही एक प्रक्रिया म्हणून अधोरेखित होण्याची शक्यता निर्माण होईल.

**अंमलबजावणीतील आव्हाने (Challenges)**

उद्योजकताप्रशिक्षण अपुरे शिक्षकांचे अंमलबजावणीत कार्यक्रमांच्या विकास-, साधन केंद्रित-परीक्षा व अभाव सुविधांचा- .ठरतात अडथळे शिक्षणपद्धतीअभ्यासक्रमातील मर्यादित लवचिकता आणि पालक करिअरधारणा पारंपरिक समाजातील-निधी तसेच .आणतात मर्यादा विकासास क्षमतांच्या उद्योजकीय, वेळ व संसाधनांच्या बंधनामुळे शाळांना नवोन्मेषी उपक्रम सातत्याने राबविणे कठीण जाते.

**अभ्यासाचे परिणाम (Implications)**

प्रस्तुत संकल्पनात्मक अभ्यासातून माध्यमिक शिक्षणातील उद्योजकता शिक्षणाच्या स्वरूपाबाबत काही महत्त्वपूर्ण शैक्षणिक सूचनांचा उलगडा होतो. या सूचनांचा उपयोग अभ्यासक्रम रचना, शिक्षक प्रशिक्षण, शाळा व्यवस्थापन आणि शैक्षणिक धोरणनिर्मिती या विविध पातळ्यांवर करता येऊ शकेल.

- **अभ्यासक्रम विकासासाठी परिणाम**

या अभ्यासातून स्पष्ट होणारी संकल्पनात्मक चौकट अभ्यासक्रम रचनेत उद्योजकीय कौशल्यांना अधिक ठळक स्थान देण्याची आवश्यकता अधोरेखित करते. अभ्यासक्रमात प्रकल्पाधारित कार्य, समस्या-केंद्रित उपक्रम आणि आंतरविषयक शिकण्याच्या संधी समाविष्ट केल्यास विद्यार्थ्यांना वास्तवाशी निगडित शिकण्याचे अनुभव मिळू शकतील. तसेच, उद्योजकीय कौशल्ये स्वतंत्र घटक म्हणून न ठेवता ती विविध विषयांमध्ये अंतर्भूत केली गेल्यास कौशल्यविकास अधिक सुसंगत आणि सातत्यपूर्ण होण्याची शक्यता निर्माण होऊ शकेल.

- **शिक्षक शिक्षण व व्यावसायिक विकासासाठी परिणाम**

उद्योजकता शिक्षण प्रभावीपणे राबविण्यासाठी शिक्षकांची भूमिका केंद्रस्थानी असल्याचे या संकल्पनात्मक अभ्यासातून सूचित होते. त्यामुळे शिक्षक शिक्षण कार्यक्रमांमध्ये प्रकल्पाधारित अध्यापन, समस्या-आधारित शिकवणी, चिंतनात्मक संवाद आणि मेंटॉरिंग कौशल्ये यांवर भर दिल्यास शिक्षकांची तयारी अधिक सक्षम होऊ शकेल. अशा व्यावसायिक विकासाच्या संधी उपलब्ध झाल्यास शिक्षकांना उद्योजकता शिक्षण राबविताना आत्मविश्वास वाटण्याची आणि अध्यापन पद्धतींमध्ये नवोन्मेष करण्याची शक्यता वाढू शकेल.

- **शाळा व्यवस्थापन व नेतृत्वासाठी परिणाम**

शाळा-स्तरावरील निर्णय उद्योजकता शिक्षणाच्या प्रभावावर महत्त्वपूर्ण परिणाम करू शकतात. नवोन्मेष केंद्रे, विद्यार्थी उपक्रम आणि उद्योजकीय क्लब यांना शाळेच्या वेळापत्रक, मूल्यमापन प्रक्रिया आणि शैक्षणिक प्राधान्यांशी जोडले गेल्यास हे उपक्रम केवळ अतिरिक्त क्रियाकलाप न राहता मुख्य शैक्षणिक प्रक्रियेचा भाग बनू शकतील. अशा प्रकारे शाळा नेतृत्वाने संरचनात्मक पाठबळ दिल्यास उद्योजकता शिक्षण शालेय संस्कृतीत रुजण्याची शक्यता निर्माण होऊ शकेल.

- **शैक्षणिक धोरण व व्यवस्थापनासाठी परिणाम**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP 2020) च्या पार्श्वभूमीवर हा संकल्पनात्मक अभ्यास माध्यमिक स्तरावर उद्योजकता शिक्षणासाठी स्पष्ट दिशा सूचित करतो. धोरणात्मक पातळीवर कौशल्याधारित शिक्षण, व्यावसायिक शिक्षण आणि अनुभवाधारित अध्यापन यांना अधिक सुसंगत मार्गदर्शक तत्त्वे उपलब्ध करून दिल्यास शाळांना अंमलबजावणी सुलभ होऊ शकेल. तसेच, शाळांना आवश्यक संसाधने, प्रशिक्षण आणि मूल्यमापन चौकटी उपलब्ध झाल्यास उद्योजकता शिक्षण अधिक व्यापक आणि प्रभावी होण्याची शक्यता निर्माण होईल.

- **पुढील संशोधनासाठी दिशा**

प्रस्तुत संकल्पनात्मक चौकट भविष्यातील संशोधनासाठी सैद्धांतिक पाया म्हणून उपयोगात आणता येऊ शकेल. विविध शालेय संदर्भांमध्ये उद्योजकता शिक्षणाच्या अंमलबजावणीचा अभ्यास करणाऱ्या संशोधनांना ही चौकट मार्गदर्शक ठरू शकते. तसेच, शिक्षकांची भूमिका, शाळा-स्तरावरील संरचना आणि परिसंस्था-स्तरावरील सहभाग यांमधील परस्परसंबंधांचा अभ्यास केल्यास उद्योजकता शिक्षणाच्या प्रभावी मॉडेल्सविषयी अधिक सखोल समज विकसित होऊ शकेल.

**निष्कर्ष (Conclusion)**

उद्योजकीय कौशल्यांचा विकास हा आधुनिक शिक्षणाच्या मूलभूत उद्दिष्टांपैकी एक बनत असून, विद्यार्थ्यांना स्वावलंबी, नवोन्मेषी आणि रोजगारक्षम नागरिक म्हणून घडविण्यासाठी त्याचे महत्त्व अधिक प्रकर्षाने दिसून येते. राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 (NEP 2020) या कौशल्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात समाविष्ट करण्यासाठी स्पष्ट दिशा देते आणि शाळा स्तरावर अनुभवाधारित, प्रकल्पाधारित व कौशल्यकेंद्रित शिक्षणावर भर देते. या धोरणानुसार शिक्षकांची तयारी, नवोन्मेष-अनुकूल वातावरणाची निर्मिती आणि उद्योग–समुदायाशी सहकार्य हे उद्योजकीय शिक्षणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अत्यावश्यक घटक ठरतात. शाळांमधील नवोन्मेष केंद्रे, व्यावसायिक मॉड्यूल्स, विद्यार्थी चालवत असलेले उपक्रम आणि प्रत्यक्ष अनुभवांची संधी विद्यार्थ्यांमध्ये समस्या-निराकरण, नेतृत्व आणि सर्जनशीलता यांचा विकास घडवून आणतात.

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० विद्यार्थ्यांना “भविष्यासाठी सज्ज क्षमता” ("future-ready competencies")देण्यावर भर देत असल्यामुळे, उद्योजकता शिक्षण हे केवळ पूरक उपक्रम न राहता शैक्षणिक उद्दिष्टांचा केंद्रबिंदू बनते. शिक्षक, शाळा व्यवस्थापन आणि परिसंस्था—या तिन्ही स्तरांच्या समन्वयाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये स्वावलंबन, नवोन्मेष आणि उद्योजकीय क्षमता अधिक दृढपणे विकसित होतात. तथापि, प्रस्तावित संकल्पनात्मक चौकटीची प्रत्यक्ष परिस्थितीत पडताळणी आणि विविध शाळा प्रकारांतील अंमलबजावणीत असलेल्या फरकांचा अभ्यास भविष्यातील संशोधनासाठी महत्त्वाचा मार्गदर्शक ठरेल. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या उद्दिष्टांशी सुसंगत असे संशोधन शिक्षण व्यवस्थेला अधिक सक्षम, सुसंगत आणि भविष्योन्मुख बनविण्यास हातभार लावेल.

**संदर्भ सूची References**


- Ministry of Education. (2020). *National Education Policy 2020*. Government of India.
- OECD. (2019). *Future of Education and Skills 2030*. OECD Publishing.
- Piaget, J. (1972). *Intellectual evolution from adolescence to adulthood*.
- Super, D. (1990). *Life-span career development*.
- UNESCO. (2018). *Entrepreneurship Education: A Global Framework*.
- European Commission. (2016). *Entrepreneurship education at school in Europe*. Eurydice Report.
- International Labour Organization (ILO). (2020). *Global employment trends for youth*. ILO Publishing.
- Runco, M. A., & Jaeger, G. J. (2012). The standard definition of creativity. *Creativity Research Journal*, 24(1), 92–96.
- World Bank. (2020). *Skills development in South Asia: Trends and challenges*. World Bank Group.
- Bolli, T., Eichenberger, P., Rageth, L., & Oswald-Egg, M. E. (2018). *High-quality vocational education and training: indicators and concept.* Journal of Vocational Education & Training, 70(3), 1–23.
- Chadha, G., &Soni, N. (2019). *Vocational education in Indian schools: Challenges and policy gaps.* International Journal of Education and Development.
- Gibb, A. (2002). *In pursuit of a new "enterprise" paradigm for learning: Creative destruction, new values, new ways of doing things and new combinations of knowledge.* International Journal of Management Reviews, 4(3), 233–269.
- Hägg, G., &Kurczewska, A. (2016). *Learning entrepreneurship through practice: A pedagogical approach.* Education + Training, 58(7–8), 1–14.
- Lackéus, M. (2015). *Entrepreneurship in education: What, why, when, how.* OECD Publishing.
- Morris, M. H., Kuratko, D. F., & Cornwall, J. R. (2013). *Entrepreneurship programs and the modern university.* Edward Elgar Publishing.



**Citation: काशिराम. पा. मि. & झाल्टे. प्रो.डॉ. शी.,** (2026) “माध्यमिक शिक्षणातील उद्योजकीय कौशल्यांचा विकास : NEP 2020 च्या पार्श्वभूमीवरील एक संकल्पनात्मक अभ्यास”, *Bharati International Journal of Multidisciplinary Research & Development (BIJMRD)*, Vol-4, Issue-04(1), April-2026.